# मराठा सहकारी बँक लि., मुंबई

मातुश्री को-ऑप हौ.सो.लि., १९६, सर एम.व्ही.रोड, नटराज स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९

## एकाहत्तराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (फक्त सभासदांसाठी)

मराठा सहकारी बँक लि. च्या सर्व सभासदांना नोटीस देण्यात येते की, बँकेची एकाहत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. २५.०९.२०१७ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता पराग विदयालय, तळमजला, शिवाजी तलाव, भांडुप (प). मुंबई - ४०० ०७८ येथे आयोजित केली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### सभेपुढील कामकाजाची विषयसुची

१. दिनांक २४/०९/२०१६ रोजी झालेल्या ७०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ०२/०३/२०१७ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३. दिनांक ३१ मार्च २०१७ सालचा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केलेले नफा तोटा पत्रक, ताळेबंद स्विकृत करणे.
४. सन २०१६-२०१७ चा वैधानिक लेखा परिक्षकांचा तपासणी अहवाल, दोष दुरुस्ती अहवालासहित स्विकृत करणे.
५. सन २०१७-२०१८च्या वार्षिक अंदाज पत्रकास मान्यता देणे.
६. सन२०१७-२०१८ या वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेचे अधिकृत भागभांडवल वाढविण्याकरिता बँकेच्या उपविधीत दुरुस्ती करणे.
८. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे
९. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या इतर विषयांवर विचार करणे

मुंबई
दि. : ०५/०९/२०१७

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
**(श्री. विद्याधर शं.राऊळ)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सुचना :** गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा निश्चित केलेल्या जागीच सकाळी ११.३० वाजता घेण्यात येईल व पोटनियम क्र. ३५ (३) नुसार त्या सभेस गणसंखेचे बंधन राहणार नाही.

### सभासदांना महत्वाच्या सूचना

१. सभेच्या अनुषंगाने सभासदांना काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना, प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील तर त्यांनी त्या लेखी स्वरुपात दिनांक १९/०९/२०१७ रोजी वा तत्पुर्वी बँकेच्या कामकाजाच्या वेळेत प्रशासकिय कार्यालयात पोहोचतील अशा रितीने पाठवाव्यात.

२. सभासदांनी कृपया आपली ओळखपत्रे सोबत आणावीत

३. दि. ३१ मार्च २०१७ सालचा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला नफा तोटा पत्रक, ताळेबंद आपणांस नजिकच्या शाखेमध्ये किंवा मुख्य कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

४. बँकेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, सभासदांनी त्यांच्या राहत्या जागेच्या पत्त्यात बदल झाला असल्यास त्याबाबत बँकेच्या शेअर विभागास लेखी कळवावे.